**Lecture on the National Education Policy 2020**

# ‘नवीन शैक्षणिक धोरणात कौशल्य विकासावर भर, नोकरीच्याही संधी’

**प्रतिनिधी** | जळगाव



नूतन मराठा कॉलेजातील कार्यक्रमात बोलताना प्रा. जयेंद्र लेकुरवाळे.

नोकऱ्या काय रस्त्यावर पडल्या आहेत काय? समाज असे उपरोधाने म्हणतो. मात्र, त्याच पडलेल्या नोकऱ्या उचलण्याची कुवत नवीन शैक्षणिक धोरण विद्यार्थ्यांना देणार आहे. अर्थात, कौशल्य विकासावर अधिक भर या धोरणात असणार आहे, असे मत विद्यापीठाच्या विद्यार्थी विकास विभागाचे संचालक प्रा. जयेंद्र लेकुरवाळेंनी व्यक्त केले.

नूतन मराठा महाविद्यालयात प्राध्यापक प्रबोधिनी उपक्रमांतर्गत ‘शैक्षणिक धोरण २०२०’ या विषयावर संवाद साधताना ते बोलत होते. अध्यक्षस्थानी नूतन मराठा महाविद्यालयाच्या उपप्राचार्या डॉ. माधुरी पाटील उपस्थित होत्या. डॉ. लेकुरवाळे यांच्या समवेत महाविद्यालयाचे समन्वयक डॉ. के. बी. पाटील व प्राध्यापक प्रबोधिनीच्या चेअरमन डॉ. इंदिरा पाटील विचारपीठावर उपस्थित होत्या. पाहुण्यांचा परिचय आणि प्रास्ताविक प्राध्यापक प्रबोधिनी चेअरमन डॉ. इंदिरा पाटील यांनी केले. नवीन शैक्षणिक धोरणाचे सकारात्मक दृष्टिकोन ठेवून स्वागत केले तर निश्चितच त्याचे चांगले परिणाम दिसून येतील, असे डॉ. माधुरी पाटील यांनी अध्यक्षीय भाषणातून नमूद केले आहे. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. रत्नाकर कोळी यांनी केले. आभार प्रा. ललिता हिंगोणेकर यांनी मानले.